e-8570185

मंगळवार, दिनांक १७ जून, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मंत्रालय, मुंबई येथील ७ व्या मजल्यावरील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीच्या कार्यवृत्तातील आपल्या विभागाशी संबंधित निर्णयाचा उतारा :-

गुप्त

मुख्य सचिवांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ जून, २०२५.

शासनाचे अपर मुख्य सचिव व मुराअ (सामान्य प्रशासन) / अपर मुख्य सचिव (जलसंपदा) / अपर मुख्य सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) / अपर मुख्य सचिव (महसूल) / अपर मुख्य सचिव (वने) / अपर मुख्य सचिव (नगर विकास-१) / अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) / अपर मुख्य सचिव (नियोजन) / अपर मुख्य सचिव व वि.चौ.अ.-१ (सामान्य प्रशासन) / अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) / प्रधान सचिव (कृषि) यांना महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १५ अन्वये देण्यात आलेल्या शासनाच्या कामकाजासंबंधी अनुदेशामधील अनुदेश २७ (३) अन्वये योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

विभागाने सदर निर्णयाची **अंमलबजावणी तातडीने** करावी व तत्संबंधीची माहिती मंत्रिमंडळास देण्याकरिता विहित केलेल्या प्रपत्रात ई-समिक्षा प्रणालीवर सादर करावी. यामध्ये कोणतीही अडचण असल्यास प्रकरण शासनास त्वरित फेरसादर करावे.

उ.स. (आर-१)

मंत्रिमंडळ सचिव

प्रत (संपूर्ण कार्यवृत्ताच्या प्रतीसह) :-

१) अपर मुख्य सचिव (वित्त)
२) अपर मुख्य सचिव (नियोजन)

---

२५/६/२५

मंत्रिमंडळ बैठकीचा दिनांक : १७.०६.२०२५

विषय क्रमांक १२ : विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प

१.सदर प्रकल्प EPC तत्वावर हाती घेण्याकरीता महामंडळाने राबविलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्यास मान्यता मिळण्याबाबत.

२.प्रकल्प "बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा" या तत्वावर हाती घेण्यास तत्वत: मान्यता मिळण्याबाबत.

३.भूसंपादनाकरीता प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत..

या विषयावरील विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१. महामंडळाने विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्प EPC तत्वावर हाती घेण्याकरीता राबविलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्यास मान्यता देण्यात यावी.

२. विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पाच्या एकूण १२६.०६ कि.मी. लांबीपैकी मौजे. नवघर, जि.पालघर ते मौजे बलावली, ता.पेण अशी ९६.४१० कि.मी. लांबी पहिल्या टप्प्यात महामंडळामार्फत "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" (BOT Basis) या तत्वावर हाती घेण्यास मान्यता देण्यात यावी.

३. विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका या प्रकल्पाची भूसंपादनाची कार्यवाही तात्काळ हाती घेण्यास मान्यता देण्यात यावी. सदर प्रकल्पाकरीता भूसंपादन रक्कम रु.२२,२५० कोटी (Principal) व संभाव्य व्याज रु.१४,७६३ कोटी (Interest) असे एकूण रु.३७,०१३ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

४. सदर प्रकल्पाकरीता प्रशासकीय मान्यता, वित्तीय नियोजन व वित्तीय आराखडा, प्रारुप निविदा प्रपत्रे, सवलत करारनाम्याचा मसुदा यास महामंडळाकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या पूर्व मान्यतेनंतर महामंडळामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे निविदा प्रक्रिया हाती घेणे अनिवार्य राहील.

५. वित्त विभागाने सूचित केल्याप्रमाणे व वित्त विभागाच्या सहमतीने हुडकोला आवश्यक असलेल्या अटी "Government of Maharashtra will make good of shortfall / deficit if any in the Revenue Stream of MSRDC for the subject mentioned scheme from the State funds for making timely repayment of HUDCO loan installments as per the terms of the Loan Agreement during currency of HUDCO loan" हुडकोच्या Comfort Letter मध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात यावी.

६. मौजे मोर्बे ते करंजाडे या NHAI – VME SPUR आणि विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका या प्रकल्पामधील सामाईक लांबीमधील भूसंपादन पूर्ण करुन, प्राधान्याने बांधकाम पूर्ण करुन सदर लांबी कार्यान्वित करण्याची अट प्रकल्पाच्या करारनाम्यात समाविष्ट करावी.

कार्यवाही : अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम)

( विपुल भास्कर )
अवर सचिव
मुख्य सचिव कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२